महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**धारिका क्रमांक :८३७(३)(२८)/२२८६/दहा** **जाहिरात क्रमांक : ०२५/२०२१ ते ०३५/२०२१**

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील खालील विविध विषयातील **सहायक प्राध्यापक, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब** या संवर्गातील **अतिविशेषीकृत** पदांच्या भरतीकरीता विहित ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

**२. उपलब्ध पदसंख्या :- ९०**

**२.१ भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| जाहिरात क्रमांक | विषय | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|
| ०२५/२०२१ | नवजातशिशुरोगशास्त्र (Neonatology) | ६ | ६ |
| ०२६/२०२१ | हृदयशास्त्र (Cardiology) | १८ | १८ |
| ०२७/२०२१ | अंत:स्त्रावशास्त्र (Endocrinology) | २ | २ |
| ०२८/२०२१ | मज्जातंतूशल्य चिकित्साशास्त्र (Neuro Surgery) | १४ | १४ |
| ०२९/२०२१ | मज्जातंतूशास्त्र (Neurology) | ४ | ४ |
| ०३०/२०२१ | जठरांत्रजन्यशास्त्र (Gastroenterology) | ४ | ४ |
| ०३१/२०२१ | हृदयवाहिका आणि उरोविकृती शल्यचिकित्साशास्त्र (Cardio-Vascular and Thoracic Surgery) | १४ | १४ |
| ०३२/२०२१ | वृक्क विकारशास्त्र (Nephrology) | १० | १० |
| ०३३/२०२१ | बालरोग शल्यचिकित्साशास्त्र (Paediatric Surgery) | ३ | ३ |
| ०३४/२०२१ | मुत्रविकारशास्त्र (Urology) | ९ | ९ |
| ०३५/२०२१ | सुघटन शल्यचिकित्साशास्त्र (Plastic Surgery) | ६ | ६ |

**२.२** वर नमूद पदसंख्येमध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.३** शासन निर्णय,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,क्रमांक आरक्यूएन-१११८/प्र.क्र.१५/वैसेवा-३,दिनांक २९ मे,२०१९ नुसार महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसुचित जाती, अनुसुचीत जमाती,विमुक्त जमाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग याच्यांसाठी आरक्षण) अधिनियम २००१ मधील कलम ३(१)(क) च्या प्रयोजनार्थ राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयातील विविध विषयातील सहायक प्राध्यापक संवर्गातील पदे अतिविशेषीकृत पदे म्हणून घोषीत करण्यात आली आहेत. यास्तव या संवर्गातील नियुक्तींसाठी सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षण लागू नाही.

**३. पात्रतेचे निकष :-**

**३.१ भारतीय नागरिकत्व**

**३.२ वयोमर्यादा :-**

**३.२.१ किमान व कमाल वयोमर्यादा:-**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण / महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | दिव्यांग उमेदवार |
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ अनाथ | |
| १ डिसेंबर, २०२१ | १८ | ४० | ४५ | ४५ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

**३.२.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा ०५ वर्ष शिथिलक्षम राहील. तथापि, मागासवर्गीय उमेदवार, शासकीय कर्मचारी, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकत्तम असलेली एकच सवलत देय राहील.

**३.३.शैक्षणिक अर्हता:-**

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडून दिनांक- १२ फेब्रुवारी,२०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केलेल्या Minimum qualification for Teachers in Medical Institution (Amendment) Regulations, 2019 नुसार उपरोक्त संवर्गाकरीता उमेदवारांनी

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

खालील शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे:-

A Super Speciality post graduate qualifications in, DM/M.Ch/DNB equated to DM/M.Ch in terms of clause 4A of Shedule-I in the concerned subject and as per Regulations.

**३.४. प्राध्यान्यशील अर्हता (Preferential Qualification) :-**

**३.४.१** Preference may be given to a candidates having exceptional educational qualification or research experience in the relevant subject or both.

**३.४.२** Provided further that, the preference shall be given to candidates having three years teaching experience in the concerned subject in a recongnized Medical College as Resident or Registrar or Demonstrator or Tutor.

**३.४.३** All the selections will be made as per the MCI/NMC norms.

**३.५** शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक:-

**३.५.१** प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**३.५.२** अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

**३.६ दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण :-**

**३.६.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे,२०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**३.६.२** शासन निर्णय,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक -संकिर्ण १०२१ / प्र.क्र-५७ / २१ / वैसेवा- १, दिनांक १७ जून, २०२१ अन्वये खालील तक्तातील प्रत्येक विषयासमोर नमूद केलेले दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती/ उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहेतः-

| जाहिरात क्रमांक | विषय | अर्ज करण्यास पात्र दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|
| ०२५/२०२१ | नवजात शिशुरोगशास्त्र (Neonatology) | (1) OL (2) SLD |
| ०२६/२०२१ | ह्दयशास्त्र (Cardiology) | SLD |
| ०२७/२०२१ | अंत:स्त्रावशास्त्र (Endocrinology) | (1) OL,Dw,LC (2) SLD |
| ०२८/२०२१ | मज्जातंतूशल्य चिकित्साशास्त्र (Neuro Surgery) | SLD |
| ०२९/२०२१ | मज्जातंतूशास्त्र (Neurology) | (1) OL,LC (2) SLD |
| ०३०/२०२१ | जठरांत्रजन्यशास्त्र (Gastroenterology) | (1) OL, (2)SLD |
| ०३१/२०२१ | ह्दयवाहिका आणि उरोविकृती शल्यचिकित्साशास्त्र (Cardio-Vascular and Thoracic Surgery) | SLD |
| ०३२/२०२१ | वृक्क विकारशास्त्र (Nephrology) | (1) OL,HH, LC (2) SLD |
| ०३३/२०२१ | बालरोग शल्यचिकित्साशास्त्र (Paediatric Surgery) | (1) DW,(2) SLD |
| ०३४/२०२१ | मुत्रविकारशास्त्र (Urology) | (1) OA,BA,OL,CP,LC,DW,AAV,<br>(2)ASD(M),SLD,MI<br>(3) MD,involving (1) to (2) |
| ०३५/२०२१ | सुघटन शल्यचिकित्साशास्त्र (Plastic Surgery) | SLD |

**३.५.३** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

**४.संवर्ग/पदे तसेच आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तपशील:-**

**४.१ सर्वसाधारण:-**

**४.१.१ वेतनश्रेणी** : वेतन स्तर १० रुपये -५७,७०० ते रुपये १,८२,४००/-अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते.

**४.१.२ कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**४.१.३** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

४.१.४ अराखीव (खुला) पदाकरीता सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशी करीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमूद करणेबंधनकारक आहे.

**४.२ इतर अटी :-**

**४.२.१** निवड झालेल्या उमेदवाराला किमान ५ वर्षे सेवा करणे बंधनकारक असेल व तशा आशयाचे करारपत्र करावे लागेल. या अटीचा भंग झाल्यास रुपये १०,०००/- अथवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली रक्कम दंड म्हणून भरावी लागेल

**४.२.२** निवड झालेल्या उमेदवाराची महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५ (१९६५ चा महा.४६) अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे स्व:ताची नोंदणी करून घेणे आवश्यक असेल किंवा ती व्यक्ती कामावर रूजू होण्यापुर्वी त्या व्यक्तीचे नाव भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा केंद्रीय अधिनियम २) अन्वये भारतीय वैद्यक नोंदवहीवर नोंदलेले असणे आवश्यक असेल.

**४.२.३** शासन निर्णय वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,क्रमांक मंमंनि-२००८/प्र.क्र ४४/२००८/वैसेवा-२ दिनांक २७ मार्च,२००८ नुसार उमेदवारास खाजगी वैद्यक व्यवसाय करता येणार नाही व त्याऐवजी त्यास व्यवसाय रोध भत्ता प्रदान करण्यात येईल.

४.२.४ परिविक्षाधीन कालावधी २ वर्षे राहील.

**५.निवड प्रक्रिया:-**

**५.१** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता/अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.

**५.२** जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जांची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

**५.३** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

**५.४** चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी (लागू असल्यास) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**५.५** चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

**५.६** मुलाखती मध्ये किमान ४१% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

**५.७** सेवाभरतीबाबतची संपूर्ण प्रक्रिया सहायक प्राध्यापक महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब (सेवाप्रवेश नियम) नियम, २०१२ आणि भारतीय आयुर्विज्ञान परिषद/ राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग,नवी दिल्ली यांनी व महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनानुसार तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

**६. अर्ज करण्याची पद्धत:-**

**६.१** अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**६.२** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**६.३** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

**६.४** अर्ज सादर करण्याकरीता आयोगाचे संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**६.५** अर्ज सादर करण्याचे टप्पे:-

**६.५.१** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर यापुर्वी विहित पध्दतीने नोंदणी केली नसल्यास नोंदणी करुन खाते (Profile) तयार करणे.

**६.५.२** खाते तयार केलेले असल्यास व ते अदययावत करण्याची आवश्यकता असल्यास अदययावत करणे.

**६.५.३** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

**६.५.४** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**६.६ विहीत प्रमाणपत्रे / कागदपत्रे अपलोड करणे:-**

**६.६.१** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता अजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना पुढीलप्रमाणे कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्रे / कागदपत्रे | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | अद्ययावत नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १२ | एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रामधील नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १३ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १५ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १६ | राज्य शासकीय / बृहन्मुंबई महानगरपालिका / बेस्ट कर्मचारी यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १७ | महाराष्ट्र वैद्यकीय अधिनियम १९६५/भारतीय आयुर्विज्ञान परिषद अधिनियम १९५६ अन्वये नोंद केलेल्या प्रमाणपत्राची प्रत | PDF | ५० | ५०० |
| १८ | उमेदवारांनी धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेस भारतीय आयुर्विज्ञान परिषद/ राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांची मान्यता असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | PDF | ५० | ५०० |

**६.६.२** उपरोक्त प्रमाणपत्रे/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**६.६.३** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**६.६.४** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**६.६.५** उपरोक्त कागदपत्रांव्यतिरिक्त शैक्षणिक अर्हता तसेच अनुभवाच्या दाव्यासंदर्भातील अन्य आवश्यक कागदपत्रे तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषद / राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी सुचीबध्द केलेल्या जर्नलमध्ये प्रसिध्द झालेले शोधनिबंध, पुस्तके अथवा पुस्तकांमधील प्रकरणे, इत्यादीबाबतच्या स्वसाक्षांकित प्रती यांचा संच अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर ७ दिवसांच्या कालावधीमध्ये आयोगाच्या मुख्य कार्यालयामध्ये पोहोच होतील अशा रितीने सादर करणे अनिवार्य आहे.

**६.६.६** आयोगास पाठविण्यात येणा-या कागदपत्राच्या संचावर पदाचे नांव, जाहिरात क्रमांक व अर्जाचा क्रमांक स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. त्याशिवाय संबंधित कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

**६.७ अर्ज सादर करण्याचा कालावधी:-दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी ते दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत**

**६.८** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**६.९ शुल्क रुपये:-**

**६.९.१** अराखीव (खुला) - ३९४/- रुपये

**६.९.२** मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अनाथ - २९४/- रुपये

**६.९.३** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक शुल्क तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**६.९.४** परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

**६.१०** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

**६.१०.१** शुल्क भरण्याकरिता मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या लिंक वर क्लिक करावे.

**६.१०.२** 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' **लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षेसमोर** ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

**६.१०.३** 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील:- (१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाद्वारे

**६.१०.४** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**६.१०.५** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

**६.१०.६** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**६.१०.७ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**६.१०.८ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक २ सप्टेंबर, २०२१ - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

**६.१०.९** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीप्रकियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादी बाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

**८.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १२ ऑगस्ट, २०२१**

**उप सचिव, सरळ सेवा**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial